ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | : | मुलांचे चिमुकलें पुस्तकालय |
| लेखक | : | धनुर्धारी |
| प्रकाशक | : | जनार्दन महादेव गुर्जर, मुंबई |
| प्रकाशन वर्ष | : | १८९६ |
| मूळ ग्रंथ प्रत | : | शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे |

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रूपांतर - २०२१

१

धनुर्धारी—रचित

# मुलांचें चिमुकलें पुस्तकालय.

## नीतिधर्मपाठ १ ला.

रामवाडी
मुंबई.

(आवृत्ति दुसरी.)

किमत १ आणा.

धनुर्धारी–रचित

# मुलांचें चिमुकलें पुस्तकालय.

## नीतिधर्मपाठ १ ला.

हें पुस्तक,

जनार्दन महादेव गुर्जर

बुक्सेलर आणि पब्लिशर

दुकान रामवाडी मुंबई.

ह्यांनीं

मुंबईंत

जावजी दादाजी ह्यांच्या निर्णयसागर छा० छा०.

आवृत्ति दुसरी.

सन १८९६.

किंमत १ आणा.

(सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यांनें स्वाधीन ठेविले आहेत.)

# मुलांचें चिमुकलें पुस्तकालय.

## उद्देश.

आह्मी राहतों त्या गांवांत, शहरांत, प्रांतांत आणि अखेर दुनयेंत अशीं मनुष्यें आह्मांस पुष्कळ आढळून येतात कीं, ज्यांस विद्येचा गंध नाहीं, रीतीभातीचा संपर्क नाहीं, अब्रू, लज्जा वगैरेंचा धाक कसा तो माहीत नाहीं, आणि ह्मणूनच केवळ पशूप्रमाणें अज्ञानी, अनावर, अनाचारी व परपुष्ट अशी त्यांची स्थिति असते. व्यसनासक्त, दुष्ट, दुराचारी, उधळे, फटिंग, लफंगे, उनाड असे बहुत लोक आपण हरहमेश पाहतों. वाचन त्यांना ठाऊक नसतें, विचार करण्याची त्यांना शक्ति नसते; यामुळें, विद्येच्या संबंधानें, नीतिमत्तेच्या बाबतींत किंवा उपयुक्ततेविषयीं त्यांचा जगाला, त्यांच्या कुटुंबाला व शेवटीं त्यांचा त्यांना कांहींएक फायदा होत नाहीं. ते केवळ मनुष्यरूपी पशु होत. त्यांच्याकडे पाहून खऱ्या व थोर मनुष्याला फार वाईट वाटतें. असे लोक सद्गुण आणि मान्यता यांला सर्वस्वीं मुकतात, ही त्यांची भयंकर हानि होय ! मुलांनो, तुमची तशी स्थिति होऊं नये ह्मणून हीं चार पानें लिहिलीं आहेत, तीं चांगलीं वाचा; त्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करा; ईश्वराची प्रार्थना करून त्याला विनवा कीं, दयासागरा, करुणाघना, सच्चिदानंदा, मला सद्बुद्धि दे;

माझ्या हातून वाईट कर्में न घडतील असें कर; मी जन्मलों, मी वाढलों, त्या कुटुंबाचें, त्या कुळाचें आणि त्या देशाचें माझ्या हातून कल्याण होईल, त्याचें मी भूषण बनेन, अशी योग्यता माझ्यांत आण; सद्गुणी, सदाचारी, मानी, सत्पुरुष, सज्जन असें ह्मणवून घेण्याची जोड मला दे.

तरुणपण संपलेल्या मंडळीपुढें उपदेश करण्याचें धाडस करणें ह्मणजे, कोरड्या खडकावर सुंदर बाग उठविण्याच्या प्रयत्नासारखें होय! सांगितलेल्या गोष्टी मनांत तत्काळ ठसतील, काय सांगतात इकडे लक्ष पोंचेल, आणि साधेल तर सुधारण्याची आशा करण्यास योग्य स्थळ ह्मणजे आमची तरुण—बालमंडळीच होय. कोणत्याही दुर्गुणांचा, दुष्ट मनोविकारांचा, वाईट संवयींचा पूर्णपणें पगडा न बसलेला असा वर्ग ह्मटला ह्मणजे मुलांचाच. आमच्या लहानग्या संततीला सद्गुण, सदाचार, सत्कालक्षेप यांविषयींच निराळें सांगणारे आईबाप, आप्तबंधु, इष्टमित्र फारच क्वचित् मिळतात. लौकिकशिक्षणाच्या सोई सर्वत्र आणि सुरेख आहेत, तशा नीतिधर्मशिक्षणाच्या नाहींत. आमचें राष्ट्र हल्लीं सर्व बाबीनें मोठ्या नीचतेस पोंचलेलें आहे; आह्मां सर्वांची खरी जननी आर्यभू, ती विगतवैभव होऊन पराकाष्ठेच्या हालअपेष्टा सोशीत पडली आहे; नीतिन्याय, संपत्ति, शाहणपणा, बावनकशी सोन्यासारखी देशभक्ति, स्वजनप्रीति, परोपकारबुद्धि, कर्तृत्वशक्ति, बाणेदारपणा, साहस, शौर्य आणि धैर्य इत्यादि अनेक गुणसंपन्नता माझ्या अमुक

लाडक्यांत आहे ह्मणून जगाला दाखवीन असें ती आ-र्यभू ह्मणेल, तर तें प्रस्तुतकालीं केवळ दुःसाध्य झालें आहे. हा प्रकार अंशतः दूर करणें सर्वस्वी आमच्या लहान्या देशबंधूंकडेच आहे. तेव्हां आपणांला काय सांगावयाचें तें त्यांजपुढें सांगावें अशी साहजिक इच्छा झाली ह्मणून **"लहान मुलांचें चिमुकलें पुस्तकालय"** रचण्याचा हा प्रयत्न केला. तो कितपत साधला हें सांगण्याचें मजजवळ साधन नाहीं. तथापि माझी इच्छा अशी आहे कीं, आमच्या देशांतल्या तरुण मंडळीनें शहाणे, समंजस, पूर्ण नीतिमान्, **सत्कन्यायी** खरे देशकल्याणकर्ते, स्वभाषाभिमानी, स्वधर्मरक्षक, कर्तृत्ववान् आणि उमदे जवान असें व्हावें, इतर सर्व देशांतल्या लोकांनीं आमचे तरुण उमदे जवानांसंबंधानें पूज्यता मानावी, त्यांची वाहवा करावी, त्यांना शाबासकी द्यावी, व शेवटीं त्यांनीं जन्मास आलेल्या देशाचें भूषण व्हावें, आणि आपल्या अतुलप्रतापी, महान् कर्तृत्ववान्, पूर्ण ज्ञानी अशा पूर्वजांच्या पोटीं जन्मास आल्याचें सार्थक करावें. माझ्या इच्छेप्रमाणें प्रयत्न साधला नसेल तर दुसऱ्या कोणी हिंमतवाल्यानें तें काम हातीं घ्यावें; माझीं व्यंगें साफ, सर्व, आणि स्पष्ट पुढें मांडावींत. सुधारण्याजोगीं असतील तीं अवश्य सुधरीन. माझ्या प्रयत्नांतल्या दोषांवर कोणीही कदापि पांघरूण घालूं नये. त्यांत माझा फायदा नाहीं, उलटें नुकसान आहे. याजपेक्षां जास्त कांहीं कळविणें नाहीं.

सांप्रतच्या आमच्या दरिद्रावस्थेंत व उपासमारीच्या दिवसांमध्यें थोडक्या किमतीचीं, लहान, सोपीं, व साधीं अशीं पुस्तकें लिहावीं ही माझी फार फार इच्छा आहे. माझ्या सुदैवानें मुंबईंतले सुप्रसिद्ध, व्यवस्थित, टापटिपीचे, स्वतःच्या कमाईवर नांवालौकिकास चढलेले, कुलीन व संभावित सद्गृहस्थ आणि पुस्तकवणिक् व प्रकाशक रा. रा. जनार्दन महादेव गुर्जर ह्यांचें मला या कामीं पुष्कळ साहाय्य मिळत आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. ह्या सद्गृहस्थांच्या मदतीखेरीज व प्रोत्साहनाशिवाय माझ्या हातून लेखनसेवा बिलकुल झाली नसती, हें खरें. यास्तव माझ्या हातून कांहीं भाषासेवा घडली असें कोणी समजतील तर त्यांचें तीन चतुर्थांशांहून जास्त श्रेय ह्यांजकडे आहे. पण माझ्या कृतींतल्या दोषांचा सर्व बोजा मात्र मजवर. ह्यांजकडे लेशसुद्धां कोणीं देऊं नये अशी सविनय प्रार्थना आहे.

ता० २१ सप्टंबर १८९१.

धनुर्धारी.

**दुसरी आवृत्तिः**—पहिली आवृत्ति खपल्यामुळें दुसरी काढण्याचा आज हा प्रसंग मोठा आनंददायक असा आला आहे. शक्य त्या सुधारणा या आवृत्तींत केल्या आहेत.

ता २१ नोव्हेंबर १८९५.

धनुर्धारी.

# मुलांचें चिमुकलें पुस्तकालय.

**घरीं वागणूक.**—जन्मास आल्यापासून अन्न व वस्त्रपात्र देऊन सर्वप्रकारें आपलें संरक्षण करणारे व इहलोकींचे प्रत्यक्ष आणि साक्षात् देव **आईबाप.** बहुकष्टानें आणि अनंत संकटें सोसून राहण्याला घर वगैरे तींच संपादितात, किंवा संपादिलेलें चांगल्या प्रकारें सांभाळून ठेवितात. आईबाप, बहीणभाऊ, काका, इत्यादि लोक ह्मणजे कोण हें तुह्मांस माहीत आहेच, तें सांगण्याचें कारण नाहीं. अशीं मनुष्यें एकत्र राहतात त्याला **कुटुंब** ह्मणतात. **घर** ह्मणजे **कुटुंब.** आपलें संरक्षण करून आपणास वाढविणारीं माणसें, आपण बालपणचे दिवस काढले तें व आपला जन्म झाला तें ठिकाण आणि आपलीं ह्मणून ज्यांस आह्मीं ह्मणतों तीं मनुष्यें राहतात त्याला **घर** ह्मणण्याचा संप्रदाय आहे. यास्तव **घर** ह्मणजे जगांतील अति आनंदकारक परमप्रिय वस्तु असें प्रत्येकास वाटणें साहजिक होय.

या दुनयेंत पाय ठेवतांच आह्मां मनुष्यांस **जग** ह्मणजे काय तें घर असतें. जगांत वागण्याची शक्ति, योग्यता आणि अक्कल येई तोंपर्यंत आपले दिवस **घरांतच** जातात. आमचें **घर** ह्मणजे जगांत शिरण्याचे पूर्वीच शिक्षण घेण्याची शाळा. आमची जशी **घरीं वागणूक** त्या-

प्रमाणें ती जगांतही असावयाची हें उघड आहे. घरांतल्या वर्तणुकीबरहुकूम आमचें वर्तन बाहेर जगांत घडणार. जगांत करावयाचीं कामें अनंत व बहुकष्टसाध्य आहेत. त्यांचा धडा आपणांस **घरींच** घेतला पाहिजे. घरीं उद्धटपणानें वागणारा जगांत सलोख्यानें रहावयाचा नाहीं; घरीं सर्वांशीं भांडणारा इतरांशीं गुण्यागोविंदानें राहील कसा? घरीं अप्रिय तो जगाला आवडणार हें शक्य आहे काय? घरचा खोडकर तो बाहेर सुधा निपजेल हें केवळ अशक्य होय. ज्याला घरीं मान्यता मिळवितां येत नाहीं तो बाहेर कितपत उजेड पाडील? ज्याचे गुण घरची मंडळी गात नाहीं त्याला जगांत चाहणार कोण? तेव्हां एकंदरींत हेंच खरें कीं, **घर** जगाची शाळा; घरची वागणूक दुनयेंतल्या वागणुकीचा नमुना. ह्मणजे घरची वागणूक पाहून तो दुनयेंत कसा वागेल याचें अनुमान करितां येतें. कारण उघड आहे कीं, घरचीं माणसें ह्मणजे साऱ्या दुनयेंत बहुमोल; त्यांची प्रीति, त्यांची कळकळ, आणि त्यांची उपकारकृति, ह्या गोष्टी अन्यत्र कोठेंही मिळावयाच्या नाहींत; थोडासा गुणलेश पाहतांच संतोषानें धन्यता मानणारीं माणसें फक्त घरचींच आढळतात. दोषांकडे झांकलेली नजर काय ती एकट्या घरच्या माणसांची; केवळ गुणवैभवानें भुलणारीं आणि त्यामुळें आपण केलेल्या श्रमाची व खर्चाची सार्थकता आणि सर्व भरपाई झाली असें समजणारीं माणसें घरचींच असतात.

ज्यास अशांना खूष करतां येत नाहीं; अशांशीं गुण्यागोविंदानें वागणें साधत नाहीं, अशांशीं उत्तम वर्तणूक ठेवण्यांत कुचराई होते, त्याचे हातून बाहेर जगांत काय होणार आहे? आईबापांची पर्वा न बाळगणारा आपल्या धन्याची आणि मालकाची कितीशी उजू बाळगणार? बहीणभावंडांशीं भांडणारा मित्राच्या कामीं काय उपयोगी पडेल? घरांत अप्रिय तो जगाला कसा प्रिय होईल? असा विचार कोणासही सहज सुचणारा आहे. तेव्हां आपली वागणूक घरांत अगदीं उत्कृष्ट असली पाहिजे.

**आईबाप**—हीं घरचीं **आदिदैवतें**, त्यांच्याशीं वागण्यांत मुलांनीं फार खबरदारी घेतली पाहिजे. आपलीं अन्नदातीं आईबापें; आपलें संरक्षण करणारे आईबाप; संकटकाळीं संकटनिवारणार्थ अगोदर आईबापेंच उपयोगीं पडतात. आपलें सदा, अखंड, आणि कशाची आशा न धरितां कल्याण चिंतणारे प्राणी या दुनयेंत काय ते आईबाप; आपल्या पोरांच्या संरक्षणार्थ आणि त्यांना सुख व्हावें, त्यांना चार अक्षरें यावींत, त्यांस लोकांनीं शहाणे, सदाचारी, सज्जन ह्मणावें, ह्मणून आपलें सारें आयुष्य आणि आपला एकंदर पैसा खर्च करणारे काय ते एकटे आईबापच. आपणांसाठीं काळजी, त्रास, दगदग आणि संकटें सोसण्यास तयार आईबापांखेरीज या जगांत आणखी कोण मिळणार आहे? आणि इतकें सर्व सोसण्याचें कारण, आपल्या मुलांस शहाणपणा यावा, आपल्या मुलांनीं

लोकमान्य व्हावें, आपल्या मुलांनीं आपलें नांव राखावें एवढेंच. तेव्हां अशा माणसांचे उपकार आपल्यावर किती आहेत बरें? ईश्वराची कृपा आईबापांच्या द्वारा होत असते, ह्मणजे आईबापांस संतुष्ट राखिल्यानें ईश्वर संतुष्ट होतो अशी सर्वत्र समजूत आहे. यास्तव **सदोदित आपल्या आईबापांस पूज्य मानीत जा.** तीं सांगतात तें ऐका; त्यांच्या उपदेशाकडे लक्ष ठेवा; त्यांचा मानमरातब राखा; भक्ति, प्रीति, विश्वास आणि मान यांहींकरून तुमच्या आईबापांचें उपकारऋण तुह्मांवर आहे, त्याच्या **व्याजाची फेड** अंशतः तरी निदान करा. कारण त्यांचें सर्व उपकारऋण तुमच्यानें फेडणें जन्मोजन्मीं व्हावयाचें नाहीं, तें केवळ असाध्य आहे. कोणत्या प्रकारानें वागलें असतां आईबापांस पूज्य मानल्यासारखें होईल असा प्रश्न तुह्मांला प्रथमदर्शनीं सुचेल. तर त्याला उत्तर एवढेंच कीं, त्यांवर **प्रीति,** त्यांचा **मान** आणि त्यांच्या **आज्ञेबरहुकूम वागण्याची संवय** इंहींकरून अंतःकरणाची पूज्यता दाखवा. आईबापांवर रागावणें व त्यांची आज्ञा उल्लंघन करणें ह्मणजे त्यांचा अपमान करणें होय. त्यांची तुमच्यावर सत्ता आहे ती तुमच्या बऱ्याकरितां. दुष्ट व वाईट खोड लागूं नये आणि सदा तुमचेंच कल्याण व्हावें ह्मणून तीं तुह्मांस रागें भरतात, प्रसंगीं मारतात आणि तुमच्या इच्छेच्या आड येतात. तुह्मांला एकादी गोष्ट चांगली ह्मणून वाटत असते तशी त्यांस वाटत

नाहीं. याचें कारण तुमच्यापेक्षां त्यांना अनुभव पुष्कळ असतो व त्यांची तुमच्याविषयींची कल्याणेच्छा मोठी असते हेंच होय. त्यांच्याविषयीं मनांत कुडा भाव धरणें हा अधमपणा होय. आपल्या भषणाच्या प्रकारावरून सुद्धां आईबापांचा मानापमान व्यक्त करितां येतो. पूज्यता, नम्रपणा व मर्यादा यांहीं युक्त असें हळू, मधुर आणि "आई," "बाबा," या शब्दांनीं केलेल्या भाषणानें आईबापांस संतोष वाटतो. व त्यांत त्यांचा मान तुह्मी राखतां असें दिसतें. तेंच वर मान करून जोरानें, आणि ठांसून बोललां ह्मणजे तें त्यांस अपमानास्पद होय. "होय ग, नाहीं हो" असे शब्द न येतां फक्त "नाहीं, होय" ह्मणाल तर तो उद्धटपणा आहे. आईबापांस उलट उत्तरें देणें किंवा त्यांच्याशीं तक्रारी करणें अगर आपण असें कां केलें त्याचीं कारणें सांगत बसणें हा एकप्रकारचा त्यांचा अपमान आहे. असें करणें ह्मणजे त्यांच्यापेक्षां आपण अधिक शहाणे आहोंत असें पर्यायें दाखविणें होय. बेपरवाईनें, उद्धटपणानें, रागारागानें, किंवा जळफळत बोलणें हा एकप्रकारचा अपमान आहे. आईबाप सांगतात तें लक्ष्यपूर्वक ऐकणें हा एक त्यांस पूज्य मानण्याचा प्रकार[1] आहे. मुलांनो, लहानपणीं बुद्धि कोती असते, अनुभव फार नसतो, शहाणपणांत पोक्तपणा असत नाहीं,

---

१. दशरथपुत्र रामचंद्र यानें बापाचें वचन पाळण्याकरितां स्वतः सुकुमार लहान राजपुत्र असतांही चौदा वर्षें खडतर अरण्यवास पत्करिला.

ह्मणून एखाद्या भलत्याच गोष्टीचें वारें मनांत भरून त्याप्रमाणें वागण्याची इच्छा अनावर होते. त्यामुळें आई-बापांचा उपदेश गोड वाटत नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्यांस वाटतें आईबाप आपल्या दुःखास कारण होऊन सुखाच्या आड येतात. परंतु वास्तविकपणें क्षणिक सुखा-पेक्षां जास्त कल्याणाकडे आईबापांची इच्छा असते. तुम-च्या बाळपणची स्थिति तुमच्या आईबापांनीं पाहिलेली असते; अनुभव व शहाणपणा तुमच्यापेक्षां त्यांस जास्त असतो. जगांतला आयुःक्रम कसा आहे, कोठें कशा दग्याफटक्याच्या जागा असतात, वगैरे सर्व ते पाहून चुकलेले आहेत आणि ह्मणूनच तुह्मांस ते वारंवार सांगत असतात कीं असें करा आणि असें करूं नका. त्यांच्या सदिच्छेनें पूरित अनुभवसिद्ध अशा शहाणपणाच्या उप-देशाकडे कानाडोळा कराल तर मात्र तुमच्या मूर्खप-णाची कमाल झाली असें होईल.

आईबापांच्या **योग्य सांगण्याचा** अव्हेर कदापि करूं नये. **योग्य** सांगणें असें ह्मटलें याचें कारण एवढेंच कीं, त्यांनीं होऊन प्रसंगविशेषीं उघड अन्यायाची गोष्ट करावयास सांगितली तर ती सहसा[1] करूं नये. त्याबद्दल

---

१ हरिभजन करूं नको, असें बाप ह्मणत होता तें प्रऱ्हादानें ऐ-कलें नाहीं. मरणाची तीन वेळ शिक्षा सांगितली तरी त्याची त्यानें पर्वा बाळगिली नाहीं. श्रीछत्रपति शिवाजीला स्वराज्याची प्राणप्रतिष्ठा करावयाची इच्छा होती. त्याला त्याचा बाप शहाजी आड येई, पण तें त्यानें मान्य केलें नाहीं.

ते देतील ती शिक्षा निमूटपणें शांततापूर्वक सोसावी. खोटें बोलणें, एखाद्याचा जिन्नस न कळत उचलून आणणें, किंवा यासारखीं दुसरीं वाईट कामें आईबापांनीं सांगितलीं तर तीं साफ करीत नाहीं ह्मणून सांगावें. ते शिव्या देतील किंवा मारतील तर स्वस्थ रहावें. एके दिवशीं एका मुलाच्या बापाकडे कोणी देणेकरी रुपये मागावयास आला. बाप आंत बसला होता. घरांत आहेत काय असें दारांतूनच त्यानें विचारिलें, तेव्हां "मुला, बाहेर जा आणि मी घरांत नाहीं असें त्याला सांग" ह्मणून बाप ह्मणाला. "असें सांगितल्यानें खोटें बोलल्यासारखें होईल नाहीं हो बाबा! मला खोटें बोलूं नये असें शिकविलें आहे. मग मीं असें कसें बरें खोटें बोलावें?" असें आपल्या बापाला त्या मुलानें उत्तर दिलें. तें अगदीं रास्त होतें. उघड उघड वाईट गोष्ट असें खास ठाऊक आहे, तर मात्र मुलानें एखादे वेळीं आईबापांचें न ऐकलें तर तें योग्य[1] आहे. एरवीं सदां ऐकलेंच पाहिजे.

आईबापांनीं एखादें काम सांगितलें कीं तें तत्काळ केलेंच पाहिजे[2]. आपल्या सोईप्रमाणें काम करूं, असें ह्मणूं नका.

---

१ हरिश्चंद्र राजाचा लहान मुलगा रोहिदास तृषार्त व क्षुधाक्रांत झाला होता. जवळ पाणपोई आणि अन्नछत्र असून आंत तुझे आईबाप आहेत ह्मणून सांगितलें तरी त्याच्या शीलास विरुद्ध असें वर्तन त्याच्या हातून घडलें नाहीं.

२ श्रियाळ राजाचा पुत्र चिलया यानें आईबापांच्या सांगण्यावरून आनंदानें आपला देहसुद्धां अतिथीस अर्पण केला.

"असें करूं नये, असें केलें तर बरें नव्हे काय?" वगैरे बुद्धिवाद न विचारतां सांगणें ह्मणजे आपला शहाणपणा मिरविणें व आईबापांचा मूर्खपणा व्यक्त करणें होय. आईबापांनीं सांगितलेलें काम करीत नाहीं असें न ह्मणतां वांकडें तोंड करीत, पाय जोरानें आपटीत, किंवा दार धक्क्यानें लोटीत, किंवा इकडे तिकडे आपटाआपट करीत जाण्याची कित्येक मुलांस खोड असते, पण ती फार वाईट. त्यामुळें काम सांगणाऱ्या आईबापांचा अपमान होतो. ह्मणून असें कदापि करूं नये. पुनःपुनः तीच गोष्ट सांगण्याचा प्रसंग आईबापांवर आणणें हा एक त्यांचा अपमान करणें होय. ते सांगतील तो उपदेश, इच्छितील तसें वर्तन, आणि त्यांस आनंद वाटेल अशी राहणी आपण ठेविली पाहिजे. आईबापांस आनंद होईल असें त्यांच्या समक्ष वागून त्यांच्या पश्चात् मनसोक्त वर्तन ठेवावें हें भलाईचें काम नव्हे. असें केल्यानें आईबापांचा आपण अपमान केला असें होईल.

आपल्या वर्तणुकीनें आपल्या आईबापांचा मान राखतां येतो किंवा उपमर्द केल्यासारखें होतें. मुलें उद्धट आणि दांडगीं असलीं ह्मणजे आईबापांस लोक नांवें ठेवितात. आणि तीं सद्गुणी, सुस्वभावी असलीं ह्मणजे आईबापांची धन्यता वानितात. मुलांच्या वर्तणुकीवरून आईबापांची परीक्षा करण्याचा संप्रदाय आहे. तर मुलांनो, तुह्मींच सांगा, तुमच्या गैरवर्तणुकीमुळें आपल्या

आईबापांस लोकांनीं वाईट ह्मणावें याची तुह्मांला लाज वाटूं नये काय? तुमच्यासाठीं ज्यांनीं इतके श्रम सोसले त्यांला हें अशा रीतीनें वाईट बक्षीस तुह्मी देणार काय? मग तुह्माला लोक काय ह्मणतील? जगत्पिता ईश्वर तुह्मांस काय शासन करील हें ध्यानांत आणा आणि त्याप्रमाणें वर्तन ठेवा.

मुलें थोडीशीं मोठीं झालीं किंवा आलीकडे इंग्रजी शाळेंत जाऊन थोडेंबहुत ज्ञान मिळवूं लागलीं, ह्मणजे आपली ऐट मिरवूं लागून आईबापांस मूर्ख व अडाणी समजूं लागतात! लहानपण संपलें कीं, आई ह्मणजे स्त्रीजात अक्षरशून्य; घरकोंबडी! तिला काय समजतें! हा त्यांचा पहिला भ्रम असतो. खरोखर हा प्रकार मोठा अधमाधमतेचा होय. अशी समजूत क्षुद्रपणाची आणि हलक्या मनाची दर्शक असें कोणाही भल्या मनुष्याला वाटणार आहे. उपकारभारामुळें मुलांनीं आईपुढें सदां आपलें डोकें नमविलेंच पाहिजे. ती मूर्ख असो, अज्ञानी असो, बायकोमाणूस असो, पण तिनें आपणावर अनंत उपकार केले ही तर गोष्ट खरी. दुखण्याबाण्यांतून तिनें वांचविलें नसतें, तुमचा देह संरक्षिला नसता, तर तुमच्या या पोकळ घमेंडी कोठून उत्पन्न होत्या, एशियाखंडाचा भूगोल, समुद्रांचीं नांवें, चंद्राच्या कक्षा व इतिहासांतल्या गोष्टी बापास ठाऊक नसतील ह्मणून काय त्यानें केलेले उपकार विसरावयाचे?

त्याच्या उपकारांची फेड करावयाची सुटेल? नाहीं; खचीत नाहीं. आईबापांशीं उद्धटपणा न करणारीं मुलें आपल्या देशाशीं उद्धटपणा करणार नाहींत. आईबापांच्या आज्ञा शिरसावंद्य मानणारे राजाच्या व त्याच्या कायद्याच्या आज्ञा मान्य करतील. आईबापांस अप्रिय तो साऱ्या दुनयेला अप्रिय. यास्तव आईबापांच्या आज्ञा मानल्याच पाहिजेत.

**बहीणभावंडें**—घर हें एक राष्ट्रच आहे. आईबाप तेथले मालक. बाप राजा आणि आई राणी. इतर वडील आप्त अधिकारी, आणि आपण मुलें प्रजा असें समजावें. बहीणभावंडें एकाच आईबापांच्या नजरेखालीं असतात. आपणांवर प्रीति असते तशीच आणि तितकीच त्यांची आपल्या भावांवर आणि बहिणींवर असते. आपल्या भावांबहिणींस दुःख देणें, त्यांस त्रास होईल असें वागणें, ह्मणजे आईबापांस दुखविणें व त्रास देणें होय! आणि तें तर महत्पाप. भाऊबहीण यांच्याशीं गोडीगुलाबीनें आणि सख्यत्वानें वागलें पाहिजे. वडीलपणाचें नातें तुह्मांकडे असेल तर उद्धटपणा दाखवूं नका. त्यांना कमी लेखणें वाईट काम आहे. प्रत्यक्ष भावांबहिणींशीं वागतांना हलकेपणा आणि मोठेपणा मनांत आणला तर दुनयेंतली वागणूक तुमच्याकडून कशी चांगली घडेल? दुर्दैवानें आमच्या देशांत बंधु ह्मणजे दावेदार, तंटा करणारे अशी समजूत आहे. आपसांत भांडून आईबापांनीं

राखून ठेविलेली संपत्ति उधळून टाकावयाची असा प्रकार हरहमेश घडतो. एकदां आमचें राष्ट्र स्वतंत्र व सुखी होतें, त्या वेळीं ठिकठिकाणीं महासंपत्तिमान् व शौर्यशाली अशीं शेंकडों भाग्यवान् राज्यें असत; कित्येक नामांकित कुबेराप्रमाणें संपत्तिमान् घराणीं होतीं; तीं सर्व भाऊबंदकीच्या तंट्यांमुळें नाहींशीं झालीं. आपण तंटा करून दुसऱ्याची धन करावी, याला कोण शहाणपणा ह्मणत असतील ते ह्मणोत. एका आईच्या पोटीं जन्मास यावें, एका घरांत रहावें, खावें, प्यावें, शहाणें व्हावें आणि शेवटीं भांडून उभयतांनीं कफल्लक व्हावें हा प्रकार खरोखर माणुसकीला काळोखी आणतो. मुलांनो, भाऊबंदांचा तंटा ह्मणजे काय, याची आजन्मांत ओळखच नाहीं असें तुह्मी वर्तन ठेवा. "नास्ति बंधुसमं बलं" हें विसरूं नका. एकोपा, जूट, संगनमत यानें केवढालीं असाध्य कामें साध्य होतात व मागें झालीं आहेत हें पहा. आपला महाराष्ट्रदेश, **चिमाजीअप्पा** आणि **बाजीराव** या उभयतां बंधूंच्या सलोख्यानें केवढ्या महत्पदास चढला होता हें इतिहासांतून तुह्मीं वाचलेंच असेल. संपत्ति, शौर्य, कर्तृत्व, शहाणपणा, कदर इत्यादिकांमुळें या आपल्या परमप्रिय मायदेशानें सर्व हिंदुस्थान आणि तेंही हांहां ह्मणतां कसें दणाणून सोडिलें! पण हायरे दैवा! त्याच सुसंपन्न प्राणप्रिय देशाची राघोबाच्या भाऊबंदकीनें अखेर कोण दुर्दशा झाली, हेंही तुह्मीं वाचलें आहांच. अशीं

पुष्कळ उदाहरणें आहेत. तीं पाहून तुह्मीं सावध व्हावें. प्रीति, सलोखा आणि शांतता भावांभावांत असलीच पाहिजे तरच तो मनुष्य. पाठीशीं पाठ लावून आलेल्या भावांशीं गुण्यागोविंदानें मिळूनमिसळून राहतां येत नाहीं, तो इतरांशीं कसा वागेल? अशी लोकांनीं शंका घेतली तर ती खोटी काय?

बहिणी काय बिचाऱ्या लहानपणीं आठदहावर्षें तुमच्या घरीं राहणाऱ्या. त्यांस दुसऱ्याच्या घरीं जाऊन आपलें आयुष्य क्रमावयाचें असतें. त्यांचें सर्वप्रकारें संरक्षण करण्याचा मक्ता घेतलेले निराळेच. संकटकाळीं चार गोड शब्दांनीं त्यांचें सांत्वन करावें, त्यांस गरज पडली तर साहाय्य द्यावें, हें काम तुमचें. आईबापांच्या पश्चात् भावांस त्या आपले आईबाप समजतात. त्यांच्याशीं विरोध करून त्यांचा आशावृक्ष कां तोडतां! चार दिवसांची सोबत व सहवास असतो, त्यांत भांडण तंटे करीत बसावयाचें हें काय थोरपणाचें लक्षण?

त्याचप्रमाणें इतर आप्तइष्ट यांच्याशीं तुमची वर्तणूक चांगली असली पाहिजे. चांगली वर्तणूक ह्मणजे भलेपणा, सभ्यता, शहाणपणा यांस शोभून माणुसकीच्या मनोधर्माला अनुरूप अशी असावी. शांतता, सहनशीलपणा, आणि भलाई हीं तीन अंगीं असलीं ह्मणजे सर्व सुरळित चालतें. ते तीन गुण संपादण्याचे प्रयत्न ठेवा.

आणखी अखेर तुह्मीं कोणत्या कुळांत जन्मलां, तुमच्या

कुळाचा नांवलौकिक कसा आहे, तुमच्या घराण्याची प्रतिष्ठा केवढी, याचें चांगलें स्मरण ठेवून त्याप्रमाणें वर्तन करा. आपल्या एकट्याच्या क्षणिक लहरीसाठीं भलतेंसलतें मनसोक्त आचरण करून साऱ्या घराण्यास आणि मृतपूर्वजांस कलंक लावणें महानीचतम कृत्य. हें तुह्मांस कळतें, तर आपला, आपल्या वडिलांचा, आपल्या घराण्याचा, आपल्या मंडळाचा आणि नंतर आपल्या देशाचा मान वाढेल, असलेली इभ्रत कायम राहील, अशाविषयीं फार फार जपलें पाहिजे.[1] आपल्यावरील जबाबदारी ओळखिली ह्मणजे निम्में काम झालें, तें तेवढें करूया.

---

१. श्रीमंत पेशवे माधवराव व राघोबा आपसांत भांडूं लागले तेव्हां माधवरावानें राघोबास ह्मटलें, काका! नानासाहेब वगैरे वडील, आह्मी असें करितों हें पाहून काय ह्मणतील? गिलच्यांचा सूड घ्यावयास नको काय? त्याचप्रमाणें माधवरावाचा भाऊ नारायणराव अंगावर हत्ती चालून येतो असें पाहून पळूं लागला तेव्हां माधवरावानें त्याचा हात धरून विचारिलें, अरे तूं शूर बच्चा आणि असा पळून कां चाललास? अखबरनवीस काय ह्मणतील?

## धनुर्धारीकृत पुस्तकें, विक्रीस तयार.

केरळकोकिळच्या वर्गणीदारास एकदम दोन रुपयांचीं पुस्तकें घेणारास किंमतीच्या पाऊणपटीनें मिळतील.

## महाराष्ट्रकुटुंबसंग्राह्यपुस्तकावली.

१ मराठ्यांच्या मर्दुमकी. भाग १. ... ... किं. ०=

२ मराठ्यांच्या मर्दुमकी. भाग २. ... ... किं. ०≡

३ जवानमर्द ब्राह्मणभाई. बापू गोखले. ... किं. ०=

४ जवानमर्द ब्राह्मणभाई. विठ्ठल शिवदेव. भाग २. किं. ०≡

५ जवानमर्द ब्राह्मणभाई. हरिपंत फडके. भाग ३. किं. ०=

६ जवानमर्द मराठेगडी. होळकर. भाग १. ... किं. ०=

७ जवानमर्द मराठेगडी. जनकोजी शिंदे. भाग २. किं. ।–

८ पानपतचा मोहरा. ... ... ... ... किं. ।–

९ शूर अबला.... ... ... ... ... किं. ०=

१० वीरस्नुषा राधाबाई. आवृत्ति २ री.... ... किं. ०=

मराठ्यांचा पत्रबद्ध इतिहास, मोडी. ... ... किं. ।≡

आपल्या देशाचा लहानसा इतिहास. ... ... किं. ।=

११ राजकार्यधुरंधर मंडळी. फडणीस नाना. ... किं. ।=

२ प्रापंचिकांचा पुस्तकसंग्रह.

१ पैसा कसा मिळेल? ... ... ... ... किं. ।।०

---

१ आपणांवरील जबाबदारी. ... ... ... किं. ०–।।०

२ स्वभाव. किं. ०–।।० ३ अभ्यास. ... किं. ०।।

४ आजोबानें नातवास सांगितलेल्या गोष्टी. ... किं. ०–।।

सचित्र.

## केरळकोकिळमासिकपुस्तक.

मुलांनीं व स्त्रियांनीं वाचण्यास योग्य. वर्षाचीं सुंदर चित्रें १२ आणि नवीन, अपूर्व, चटकदार असले चमत्कारिक गमतीचे लेख, पृष्ठें ३८४; रु० १॥३ भरले कीं वर्षभर माहेवारीनें वाचावयास मिळतात.

### मुलांची स्मरणवही—किंमत ३ आणे.

वऱ्हाडचे डायरेक्टर साहेब व डे. एज्युकेशनल् इनस्पेक्टर दक्षिणभाग व विद्वान् गृहस्थ व पत्रकर्ते ह्यांचे उत्तम अभिप्राय आले आहेत.

नामदार न्यायमूर्ति **महादेव गोविंद रानडे** ह्यांचा अभिप्राय—

"रा. रा. दत्तो कृष्ण सांडू मुक्काम मुंबई, यांस साष्टांग नमस्कार वि० वि० तुमचें पुस्तक, समग्र वाचून पाहिलें, पुस्तकाचें नांव ' मुलांची स्मरणवही ' यापेक्षां 'मुलांना उपदेश ' हें दिलें असतें तर बरें झालें असतें. पुस्तक लहान मुलांच्या फार उपयोगी आहे, व तें सर्वांनीं संग्रहीं ठेवण्यासारखें आहे. त्यांतील भाषा साधी व मुलांना समजण्याजोगी आहे. कळावें, हे विनंति."

## मुलांमुलींस खाऊ.

मि० पित्रे. बी. ए कृत. ह्यांत सोप्या भाषेनें मुलांच्या मनावर बोधाचा ठसा उमटेल अशा गमतीच्या प्रचारांतील गोष्टी आहेत. किं. ८= ट. ख. ८॥.

( १२–१७ )

**जनार्दन महादेव गुर्जर,**
दुकान–रामवाडी, मुंबई.